**<u>ठळक बातम्या</u>**

- शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना ३० जूनपूर्वी जाहीर करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

- जनगणना २०२७ अंतर्गत राज्यभरात ११ लाख १४ हजार २७७ कुटुंबांनी केली स्व गणनेची प्रक्रिया पूर्ण/ पुण्यात सर्वाधिक नोंदणी

- नीट परीक्षा पेपरफुटीप्रकरणी आरोपी मनिषा मांढरेला १४ दिवसांची सीबीआय कोठडी

- पाच देशांच्या दौऱ्यादरम्यान आज प्रधानमंत्री स्वीडनला पोहचले / महत्त्वाच्या विषयांवर करणार चर्चा

**आणि**

- थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुषांच्या दुहेरी गटात भारताला उपविजेतेपद

**<><><><><><>**

शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी देण्याची तयारी अंतिम टप्प्यात आली असून येत्या ३० जूनपूर्वी यासाठीची योजना जाहीर करू, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज पुण्यात केली. याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत तपशीलवार चर्चा झाली असून बाकी राहिलेल्या काही जिल्ह्यांची आकडेवारी मिळताच योजना जाहीर केली जाईल, असं त्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**<><><><><><>**

जनगणना २०२७ अंतर्गत स्वगणनेचा टप्पा पूर्ण झाला असून राज्यभरात ११ लाख १४ हजार २७७ कुटुंबांनी स्व गणनेची प्रक्रिया पूर्ण केली आहे. १ मे ते १५ मे दरम्यान ही प्रक्रिया राबवली गेली. पुणे, मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्ह्यातल्या नागरिकांनी स्वगणनेत सर्वाधिक सहभाग नोंदवला. पुण्यात १ लाख ५३ हजार ५६८ कुटुंबांनी, मुंबई उपगनर जिल्ह्यात १ लाख २१ हजार ६८ आणि ठाणे जिल्ह्यात १ लाख १६ हजार ५१२ कुुटुंबांनी स्वगणनेची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली. त्याखालोखाल मुंबई जिल्ह्यात ६१ हजार २९५ तसंच नाशिक जिल्ह्यात ५२ हजार ६६७ कुटुंबांची स्वगणनेत नोंद झाली. गडचिरोली जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजे ३ हजार ६८८ कुटुंबांनी स्वगणना केली. गोंदिया जिल्ह्यात फक्त ३ हजार ८८१, नंदुरबार ६ हजार ९५७ तर वर्धा जिल्ह्यात ७ हजार ६१८ कुुटुंबानी स्वगणनेची प्रक्रिया पूर्ण केली.

ज्या कुटुंबांनी स्व-गणना प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली आहे, त्यांनी त्यांच्या भागात येणाऱ्या प्रगणकाला ‘H’ या अक्षराने सुरू होणारा ११ अंकी स्व-गणना ओळखक्रमांक द्यावा, यामुळे माहिती संकलन प्रक्रिया सुरळीतपणे पूर्ण होण्यास मदत होईल, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

<><><><><>

नीट प्रवेश परीक्षा २०२६चे पेपर फुटल्याप्रकरणी आरोपी मनिषा मांढरेला दिल्लीच्या राऊज अवेन्यू न्यायालयानं १४ दिवसांची सीबीआय कोठडी दिली आहे. या प्रकरणाचा तपास सीबीआयनं सुरु केल्यानंतर पुण्यातून आरोपीला काल अटक केली होती. नीटचा जीवशास्त्राचा पेपर फोडण्यात मांढरे प्रमुख सूत्रधार असल्याचं सीबीआयनं सांगितलं.

<><><><><>

नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयच्या पथकानं आज नांदेडमध्ये चौकशी केली. एका पालकानं आपल्या मुलीसाठी पाच लाख रुपये देऊन पेपर खरेदी केल्याचा आरोप आहे. त्याबाबत ही चौकशी केली असून, अधिक चौकशीसाठी या दांपत्याला आता पुण्यातल्या सीबीआय कार्यालयात येत्या मंगळवारी बोलावलं आहे. नांदेडमधल्या आणखी काही पालकांची चौकशी होणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><><>

छत्रपती संभाजी महाराज यांच्या दहा फुटी पूर्णाकृती शिल्पाचं अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज पुण्यात झालं. बुधभूषण हा ग्रंथ हातात घेतलेलं, संभाजी महाराजांचं हे देशातलं पहिलंच कांस्य शिल्प आहे. छत्रपती संभाजी महाराज उद्यानातल्या या शिल्पाशेजारी बुधभूषण ग्रंथातले ९ निवडक श्लोक आणि त्यांचं मराठी आणि इंग्रजी भाषांतर दगडी भिंतीवर कोरलं आहे.

पुणे महानगरपालिका आणि आपुलकी हेल्थकेअर यांनी संयुक्तपणे उभारलेल्या कर्करोग केंद्राचं लोकार्पणही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं.

पुण्यात हडपसर इथं समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाण्याच्या नऊ साठवण टाक्यांचं लोकार्पण, तसंच मुंढवा इथला महात्मा फुले चौक मेट्रो आणि दुमजली उड्डाणपुलाचं भूमिपूजनही दूरस्थ पद्धतीनं मुख्यमंत्र्यांनी केलं. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

राज्यातल्या अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज सांगितलं. ते आज नागपुरात बातमीदारांशी बोलत होते. राज्याच्या विकास आणि पायाभूत सुविधांसाठी वाळू आवश्यक आहे. मात्र, वाळू वाहतूक ही नियमांच्या चौकटीत आणि रॉयल्टीनुसारच झाली पाहिजे. चुकीच्या पद्धतीनं वाळूचं उत्खनन आणि वाहतूक चालू देणार नाही. त्यासाठी राज्यभर कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार नागपूरसह भंडारा आणि विविध जिल्ह्यांमधे मोठ्या प्रमाणावर कारवाई केली असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

उत्तर महाराष्ट्राचा पाणीप्रश्न सोडवणारा नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्प आता लवकरच मार्गी लागणार आहे. राज्य शासनाच्या जलसंपदा विभागानं या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ४ हजार ११६ कोटी रुपयांच्या कामाचे कार्यारंभ आदेश जारी केले आहेत. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी ही माहिती दिली.

या प्रकल्पाअंतर्गत उंबरपाडा, सारन्यावन, प्रतापगड, राक्षसभुवन, मिलान, घोडी, उखेडमाळ, सावरपाडा आणि देवमाळ या नऊ ठिकाणी धरणं

उभारली जाणार आहेत. याशिवाय माणखेड आणि सालभोये इथं मोठे जलसाठे, तसंच अत्याधुनिक पंप हाऊस, इलेक्ट्रो-मेकॅनिकल यंत्रणा आणि जलवाहिन्यांचं जाळे तयार होणार आहे.

दरम्यान, नाशिक शहरासह जिल्ह्यात २६ प्रकल्पांमध्ये आता केवळ ३२ टक्के पाणी साठा शिल्लक राहील्यानं पाणीटंचाईची समस्या तीव्र झाली आहे. जिल्ह्यात दररोज ११६ टँकर २४२ फेऱ्या करत तहानलेली गावं, आणि वाड्यावस्तींवर पिण्याचं पाणी पोहचवत आहेत. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासनानं ४४ विहिरी अधिग्रहित केल्या आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी त्यांचा नेदरलँड्सचा दौरा आटोपून दौऱ्याच्या तिसऱ्या टप्प्यात आज दुपारी स्वीडनमधे गुटेनबर्ग इथं पोचले. विमानतळावर स्वीडनचे प्रधानमंत्री उल्फ क्रिस्टरसन यांनी त्यांचं स्वागत केलं. दोन दिवसांच्या स्वीडन दौऱ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी क्रिस्टरसन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. या चर्चेत व्यापार, हरित स्थित्यंतर, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्टार्टअप्स, पुरवठा साखळी, संरक्षण, अंतराळ आदी क्षेत्रातल्या सहकार्यावर भर दिला जाईल. प्रधानमंत्री मोदी आणि क्रिस्टरसन युरोपियन युनियनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देअर लेन यांच्यासह युरोपियन राऊंड टेबल फॉर इंडस्ट्रीय या व्यापारी मंचाला संयुक्तपणे संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीच्या 'मन की बात' कार्यक्रमातून येत्या ३१ मे रोजी रविवारी सकाळी अकरा वाजता जनतेशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३४ वा भाग असणार आहे.

या कार्यक्रमासाठी, नागरिकांना मोफत दूरध्वनी क्रमांक १८०० -११–७८०० यावर आपले विचार आणि सूचना पाठवता येतील. तसंच, नरेंद्र मोदी ॲप आणि माय जी ओ व्ही ओपन फोरम च्या माध्यमातूनही माहिती पाठवता येऊ शकते. यासह १९२२ या क्रमांकावर मिस्ड कॉल देऊन आणि त्यानंतर एस.एम.एस.वर प्राप्त लिंकद्वारेही आपल्या सूचना पाठवता येतील.

<><><><><>

थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरी गटात भारताच्या सात्विक साईराज रांकी रेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. इंडोनेशियाच्या लिओ रोली कार्नांडो आणि डॅनियल मार्टिन या जोडीनं त्यांचा २१ - १२, २५- २३ असा पराभव केला.

<><><><><>

चीनमध्ये सुरू असलेल्या बाओजी चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या श्रियांशी वलीशेट्टी हिने महिला एकेरी प्रकारात रौप्यपदक पटकावलं. मात्र, अंतिम फेरीत चीनच्या आन ची युआन हिच्याकडून तिला १४-२१,६-२१, अशा सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागले.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज धरमशाला इथं सुरु असलेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं पंजाब किंग्जपुढं विजयासाठी २२३ धावांचं आव्हान ठेवलं आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं निर्धारित २० षटकात ४ गडी गमावून २२२ धावा केल्या. व्यंकटेश अय्यरच्या नाबाद ७३ धावांचा

त्यात मोलाचा वाटा आहे. विराट कोहलीनं ५८, तर देवदत्त पडिक्कलनं ४५ धावांचं योगदान दिलं. शेवटची बातमी हाती आली तेव्हा पंजाब किंग्जच्या १८ षटकात ६ बाद १८३ धावा झाल्या होत्या.

या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडीयमवर दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॅायल्स यांच्यात होत आहे. थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

<><><><><><>

गेल्या २४ तासात राज्यात कमाल तापमानात वाढ झाली. सर्वात जास्त कमाल तापमान अमरावती आणि वर्धा इथं ४६ अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><><>//